# महात्मा जोतीबा फुलेंचे स्त्री श्रेष्ठत्व व स्त्री-पुरुष समानताविषयक विचार : एक समाजशास्त्रीय अध्ययन

शोधपत्र-समाजशास्त्र

*कु. महानंदा राऊतखेडकर

**महात्मा जोतीबा फुलें दूरदृष्टी असणारे सामाजिक विचारवंत होते. म. जोतीबा फुलें यांचा केवळ स्त्रीमुक्ती चळवळीचे उद्‌गाते म्हणून विचार करता येणार नाही तर काळाला भेदणारी दूरदृष्टी असणारा एक भारतीय सामाजिक विचारवंत म्हणून त्यांचा विचार करावा लागतो. कारण म. फुलेंना माहीत होते की, समाजाचा अर्धा भाग असलेल्या स्त्रियांची स्थिती जोपर्यंत सुधारणार नाही, त्यांची प्रगती, विकास साध्य होणार नाही, एक माणूस म्हणून समाज जोपर्यंत त्यांचा स्वीकार करणार नाही, तोपर्यंत भारतीय समाजाची प्रगती होणार नाही. हे म. फुलेंनी त्याकाळीच ओळखले होते. म. फुलेंच्या स्त्री श्रेष्ठत्वाच्या व स्त्री-पुरुष समानताविषयक विचार व कार्यामुळेच आज भारतातील शतकानुशतके गुलामगिरीच्या जोखडात असलेल्या स्त्रियांना स्वाभिमानाने जगता येणे शक्य झाले. मनु व मनुस्मृती तसेच पारंपारिक धर्म संस्कृती यांनी स्त्रियांना सांगितलेल्या स्वर्गाच्या सुखापेक्षा निळयाशार कर्तृत्वाच्या आकाशात पक्षाप्रमाणे स्वच्छंदपणे उडण्याचा आनंद आज मिळवता येत आहे. आणि याचे सर्व श्रेय जाते ते युगपुरुष महात्मा जोतीबा फुले यांना.**

**कार्यक्षेत्र व संशोधन पद्धती :-** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी कोणत्याही शहराची, गावाची मर्यादा न ठेवता उपलब्ध झालेल्या दुय्यम तथ्य सामुग्रीद्वारा म. जोतीबा फुलेंचे स्वत:चे प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ, तसेच त्यांच्यावर लिहिलेले इतर विचारवंताचे, तज्ज्ञांचे लिखाण हे कार्यक्षेत्र निश्चित केले आहे. या दुय्यम तथ्य सामुग्रीच्या उपलब्धतेसाठी 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', 'महात्मा फुले गौरव ग्रंथ', 'दै. पत्रिका', 'स्त्री विशेषांक', 'स्त्रीसंबंधी पत्रिका', 'वैचारिक लेख', 'शोधनिबंध' आणि 'विविध मासिके' या सर्वांचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधन आराखडा :-**

**वर्णनात्मक संशोधन आराखडा :-** एखाद्या समस्येशी संबंधित असलेल्या वास्तविक तथ्यांच्या आधारावर वर्णनात्मक विवेचन करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश असतो. तसेच वर्णनात्मक संशोधन आराखड्यामध्ये समस्येची ऐतिहासिक पार्श्वभूमी विचारात घेऊन केवळ वर्णन केले जाते. प्रस्तुत संशोधन निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**उद्देश :-** १) महात्मा ज्योतीबा फुलेंच्या स्त्री श्रेष्ठत्वाच्या विचारांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणे. २) महात्मा ज्योतीबा फुलेंच्या स्त्री-पुरुष समानताविषयक विचारांचे अध्ययन करणे.

**शोध निबंधाची व्याप्ती व मर्यादा :-** महात्मा ज्योतीबा फुलेंच्या एकूण साहित्यातून त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक व इतर अनेक पैलुंविषयी विचार व्यक्त होतात परंतु प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या स्त्रीश्रेष्ठत्व आणि स्त्री-पुरुष समानता या विचारांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजेच प्रस्तुत शोध निबंधासाठी विचारात घेतलेले अध्ययन क्षेत्र हे महात्मा जोतीबा फुले यांचे श्रेष्ठत्व आणि स्त्री-पुरुष समानता या विचारापुरतेच मर्यादित स्वरूपाचे आहे.

**महात्मा जोतीराव फुलेंचे स्त्रियांच्या श्रेष्ठत्वाविषयी विचार** :- प्राचीन काळापासूनच भारतीय समाजव्यवस्थेत काही अपवाद वगळता स्त्रियांना दुय्यम दर्जाचीच वागणूक दिली जाते. पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावामूळे स्त्रियांचे स्वातंत्र्य, अधिकार नाकारून त्यांना गुलामीत ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. पुरुषी वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी स्त्रियांसाठी अनेक रूढी, प्रथा, परंपरा निर्माण केल्या जातात. स्त्रियांना अत्यंत निकृष्ट, अमानवी, दयनीय जीवन जगण्यास भाग पाडले जाते. अशाप्रकारे पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत असलेले स्त्रियांचे दुय्यम स्थान लक्षात घेऊन महात्मा जोतीबा फुले यांनी स्त्रियांच्या श्रेष्ठत्वासंबंधी विचार मांडले आहेत. जे की, अत्यंत प्रागतीक स्वरूपाचे असून, तत्कालीन एकूणच सामाजिक परिस्थितीचा विचार केल्यास अत्यंत क्रांतिकारक स्वरुपाचे असेच आहेत. महात्मा जोतीराव फुले यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात 'स्त्री आणि पुरुष' या प्रकरणात बळवंतराव हरी साकवळकर आणि म. फुले यांचा संवाद आहे. त्या संवादावरून, प्रश्न उत्तरावरून महात्मा फुलेंचे स्त्री श्रेष्ठत्वासंबधीचे विचार आपणास समजतात ते पुढीलप्रमाणे.

बळवंतराव : या उभयतां स्त्री-पुरुषांमध्ये ज्यास्ती श्रेष्ठ कोण आहे? जोतीराव : या उभयतांमध्ये ज्यास्ती श्रेष्ठ स्त्री आहे[१]

बळवंतरावांच्या प्रश्नाच्या उत्तरात महात्मा फुले स्त्री व पुरुषांमध्ये स्त्रीला श्रेष्ठ मानतात. ज्या काळात स्त्रियांचे मनुष्य म्हणून अस्तित्वच नाकारण्यात आले होते. अशा सनातनी समाजातील परंपराधिष्ठीत

* संशोधक विद्यार्थीनी, समाजशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड [ महाराष्ट्र ]

विचारप्रणालीच्या विरूद्ध क्रांतिकारक स्वरूपाचे स्त्रीविषयक विचार महात्मा फुलेंनी व्यक्त केले आहेत. यावरून तत्कालीन समाजाचे स्त्रियांच्या बाबतीत मानसिक परिवर्तन करण्याचे महात्मा फुलेंचे प्रयत्न दिसून येतात. तसेच स्त्री श्रेष्ठत्वासंबंधी विचार व्यक्त करत असतांना महात्मा फुले म्हणतात "निर्मिकाने निर्माण केलेल्या चमत्कारिक, मोह उत्पन्न करणाऱ्या भवसागरात तरंगून मजा मारणारे क्षणिक उभयता मानव प्राणी आहेत. त्यातून स्वभावे स्त्रीची जात भीडस्त असल्यामुळे ती प्रथम एका पुरुषास सलगी करण्यास सवड देते आणि ती सलगी हा कामार्थी पुरूष इतकी वाढवितो की अखेरीस ती स्त्री स्वत:हून त्यास आपला मदतगार, वाटेकरी, सखा करते आणि तीच सृष्टी नियमास अनुसरून ब्रह्मचारी शंकराचार्याच्या तोलाच्या मुलाचेसुद्धा आपल्या उदरी काकू केल्याशिवाय निमूटपणे रात्रंदिवस ओझे वागविते. तिच आपल्या सर्वास जन्म देणारी होय. यावरून नि:संशय पुरुषापेक्षा स्त्री श्रेष्ठ आहे[२] महात्मा फुले यांनी आपल्या साहित्यातून देखील वेळोवेळी स्त्री व पुरुषांचा जो उल्लेख केला आहे त्यात देखील स्त्री श्रेष्ठत्वासंबंधीचे विचार पहावयास मिळतात, ते पुढीलप्रमाणे - "कुटुंब, गाव, देश आणि पृथ्वी अशा विविध पातळयांवर अधिकारधारक असतात, त्याचा उल्लेख जोतीराव अनुक्रमे 'माता अथवा पिता', 'पाटलीण अथवा पाटील', 'देशमुखीन अथवा देशमुख', 'महाराणी अथवा महाराजा' असा करतात. या ठिकाणी स्त्रीलिंगी उल्लेख प्रथम आहे हा केवळ योगायोग म्हणता येणार नाही"[३]

**महात्मा फुलेंचे स्त्री-पुरुष समानता विषयक विचार:-** महात्मा ज्योतीबा फुले यांनी तत्कालीन समाजात पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना असणाऱ्या दुय्यम दर्जाची जाणीव होती. जोपर्यंत स्त्रियांचा दुय्यम दर्जा नष्ट होऊन स्त्री व पुरुष यांना समान दर्जा प्राप्त होणार नाही, तोपर्यंत सर्वच सामाजिक सुधारणा व सुधारणा आंदोलने निरर्थक, कुचकामी ठरतील याची जाण एक दूरदृष्टी असणारा समाजहितचिंतक, समाजसुधारक या नात्याने महात्मा फुले यांना होती. म्हणूनच त्यांनी आपल्या विचारातून या विषमतावादी समाजव्यवस्थेत पहिल्यांदा स्त्री-पुरुष समानता रुजविण्याचा प्रयत्न केला आणि एक नवीन समताधिष्ठीत महाराष्ट्र व पर्यायाने भारत देश घडवण्याचा, निर्माण करण्याचा प्रयत्न केला. स्त्री व पुरुषातील जैविक पातळीवरील भेद वगळला तर मानव माणूस म्हणून स्त्री व पुरुष समानच असावयास पाहिजे. त्यांच्यातील श्रेष्ठ व कनिष्ठ हा भेद अयोग्य आहे. कारण सर्व स्त्री-पुरुष एकाच ईश्वराची लेकरे आहेत. त्यामुळे स्त्री-पुरुष समान आहेत. एकाच निर्मिकाकडे स्त्री, शूद्रातिशूद्रांसह सर्व मानव प्राण्यांचे पितृत्व असल्याकारणाने बहीण-भावंड समान ठरतात. हे जोतीरावांनीही वारंवार आपल्या गद्य व पद्य लेखनातून सांगितले आहे.

मानव सारिखे निर्मिकें निर्मिले ||
कमी नाही केले || कोणी एका ||१||[४]

महात्मा फुले स्त्री आणि पुरुष समानच मानतात म्हणून पुरुषांना ज्याप्रमाणे पत्नीची निवड करण्याचा अधिकार आहे. त्यांच्या समानच मुलींनासुध्दा वर निवडण्याचा अधिकार असावा असे महात्मा फुले म्हणतात, ते पुढील विधानावरून स्पष्ट होते "कित्येक कन्या तरुण मुलांच्या कुरुपाची परवा न करिता, त्यांच्या फक्त शौर्यावर भाळून त्यास आपला पती करितात. कित्येक पुत्र तरुण मुलींच्या दुष्ट स्वभावाची पर्वा न करीता तिच्या फक्त देखणेपणावर भाळून तीस आपली पत्नी करितात. यावरून कन्या-पुत्रांनी आपल्या माता-पित्यासह वडील-धाकटे इष्टमित्रांचा सल्ला घेऊन व त्यांनी स्वत: मागे-पुढे पाहून सारासार विचार करावा.[५] तसेच महात्मा जोतीबा फुले आपल्या अखंडात, म्हणतात स्त्री आणि पुरुषामध्ये भेदभाव करू नये ते पुढीलप्रमाणे "स्त्री पुरुषांमध्ये निवड नसावी | गुणे आदरावी सर्वकाळ ||[६] सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात सर्व ठिकाणी 'माणूस' या शब्दातून 'स्त्री व पुरुष दोन्ही व्यक्त होतात असे गृहित न धरता "सर्व एकंदर स्त्री-पुरुष" असा शब्दप्रयोग केला आहे. म्हणजेच स्त्रियांना सर्व प्रकारचे न्याय, स्वातंत्र्य, समानता प्राप्त झाली पाहिजे, अशी त्यांची अपेक्षा होती. महात्मा जोतीबा फुलेंच्या स्त्रीविषयक विचारांचा गाभा किंवा वेगळेपण म्हणजे जोतीबांनी स्त्रियांना सर्व समान हक्क मिळाले पाहिजेत असा वारंवार आग्रह धरला व त्यासाठी प्रत्यक्ष कृती करण्यातही ते कधी मागे नव्हते.

**निष्कर्ष :-** १. भारतात प्राचीन काळापासून काही अपवाद वगळता स्त्रियांना दुय्यम, गौण दर्जा विविध धर्मात व पुरुषप्रधान, पितृसत्ताक संस्कृतीत देण्यात आलेला होता व आहे. अशा परिस्थितीत महात्मा फुलेंनी 'स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे' असा विचार व्यक्त केला. हा विचार म्हणजेच स्त्रियांना दुय्यम मानणाऱ्या प्रस्थापित सामाजिक, धार्मिक व्यवस्थेला छेद देणारे क्रांतिकारी, युगप्रवर्तक कार्य होते. २. महात्मा जोतीबा फुले भारतासारख्या विषमतावादी समाजव्यवस्थेत समतावादी वृत्ती जोपासणारे त्याचा पुरस्कार करणारे युगपुरुष होते. त्यानी स्त्री-पुरुष समानता समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला नाही तर कृतिदेखील केली. सामाजिक संगठन व विकासासाठी स्त्री-पुरुष समानता अत्यावश्यक आहे, हे महात्मा फुलेनी दिडशे वर्षापूर्वी जाणले होते. यातून त्यांची दूरदृष्टी दिसून येते.

## सन्दर्भ ग्रन्थ

१. कीर धनंजय, मालशे स. गं. फडके य. दि. (संपा), २००६, महात्मा फुले समग्र वाङ्मय 'सार्वजनिक सत्यधर्म, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, ६ वी आवृत्ती पृ. क्र. ४६५ २. कित्ता, सार्वजनिक सत्यधर्म, पृ. क्र. ४६५ ३. भोळे लक्ष्मण भास्कर, 'जोतीरावांची समता संकल्पना, ३ री आवृत्ती जाने. २००२, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पृ. क्र. २९ ४. धनंजय कीर, डॉ. स. गं. मालशे, डॉ. य. दि. फडके, महात्मा फुले समग्र वाङ्मय २००६, ६ वी आवृत्ती, महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पृ. क्र. ५८३, अखंड सार्वजनिक सत्यधर्म ५. धनंजय कीर, डॉ. स. गं. मालशे, डॉ. य. दि. फडके, महात्मा फुले समग्र वाङ्मय, अखंड सार्वजनिक सत्यधर्म, पृ. क्र. ५३९ ६. अखंड सार्वजनिक सत्यधर्म, पृ. क्र. ५६०, ६ वी आवृत्ती, २००६, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई. ७. भांडारकर पु.ल., १८८७, 'सामाजिक संशोधन पद्धती,', तिसरी आवृत्ती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर. ८. डॉ.बोधनकर सुधीर, प्रा.विवेक अलोणी, जाने. २००७, 'सामाजिक संशोधन पद्धती', चतुर्थ आवृत्ती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.